# प्रवेश प्रक्रिया

**As per the National Education Policy 2020**

प्रथम वर्ष बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.एस्सी.(कॉम्प्युटर सायन्स), बी.बी.ए., बी.सी.ए., बीसीए(सायन्स), बी.व्होक.(हॉस्पीटॅलिटी ॲण्ड टुरीझम, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, डेअरी प्रॉडक्टस् ॲण्ड प्रोसेसिंग, ॲग्रीकल्चर ॲण्ड सॉईल सायन्स, अकौंटिंग ॲण्ड टॅक्सेशन तीन /चार वर्ष पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया महाविद्यालयात सुरु करण्यात आलेली आहे.

- **प्रथम वर्ष बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.व्होक.(हॉस्पीटॅलिटी ॲण्ड टुरीझम, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, डेअरी प्रॉडक्टस् ॲण्ड प्रोसेसिंग, ॲग्रीकल्चर ॲण्ड सॉईल सायन्स, अकौंटिंग ॲण्ड टॅक्सेशन या अभ्यासक्रमांसाठी** आवश्यक शैक्षणिक पात्रता (Eligibility), प्रवर्ग आणि उपलब्ध प्रवेश क्षमता यानुसार गुणवत्ता / मेरीटनुसार प्रवेश देण्यात येतील.

- **प्रथम वर्ष बी.एस्सी.(कॉम्प्युटर सायन्स), बीसीए(सायन्स) या अभ्यासक्रमांसाठी** आवश्यक शैक्षणिक पात्रता (Eligibility), प्रवर्ग आणि उपलब्ध प्रवेश क्षमता यानुसार तसेच मेरीट लिस्ट नुसार प्रवेश देण्यात येतील.

- **बी.बी.ए., बी.सी.ए. या अभ्यासक्रमांसाठी AICTE च्या नियमांनुसार CET द्वारे प्रवेश देण्यात येतील.**

- प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी https://sangamnercollege.vriddhionline.com वर जावून ॲडमिशन फॉर्म भरावा. त्यासाठी खालीलप्रमाणे Step चा अवलंब करावा.

➢ **Step-1** प्रवेशासाठी https://sangamnercollege.vriddhionline.com या लिंकवर जावे.

➢ **Step-2** Login मध्ये जावून Student Registration करावे. त्यासाठी आधार संलग्न कायम स्वरुपाचा स्वतःचा मोबाईल नंबर तसेच Gmail चाच ई-मेल आय-डी वापरावा. Registration करतांना वापरलेला मोबाईल नंबर आणि ई-मेल आय-डी मध्ये बदल करु नये. महाविद्यालयाची प्रवेशप्रक्रिया, परीक्षा फॉर्म, झूम क्लासरुम टिचिंग, सर्व प्रकारच्या सूचना...इ. कारणांसाठी त्याचा वापर होईल.

➢ **Step-3** तयार झालेला युजर आय-डी व पासवर्ड वापरुन Student Login करावे. (युजर आय-डी व पासवर्ड कायमस्वरुपी जतन करुन ठेवावा. कारण पुढील वर्गांच्या प्रवेशप्रक्रियेच्या वेळी सुद्धा सदरच्या युजर आय-डी आणि पासवर्ड ची आवश्यकता आहे.)

➢ **Step-4** Student Login केल्यानंतर आपणांस ज्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घ्यायचा आहे त्या अभ्यासक्रमासाठी थेट (Direct) प्रवेश आहे का? Merit List नुसार आहे? याची खात्री करुन आवश्यकतेनुसार ॲडमिशन फॉर्म किंवा मेरीट लिस्ट फॉर्म भरावा.

➢ **Step-5** ॲडमिशन फॉर्म भरल्यानंतर फॉर्मची पाठपोट प्रिंट काढून आवश्यक कागदपत्रे जोडून फॉर्म तपासणी समितीकडून तपासून घ्यावा.

➢ **Step-6** तपासणी समितीकडून तपासून घेतलेला ॲडमिशन फॉर्म सर्व कागदपत्रांसह महाविद्यालयाच्या अकौंट विभागात प्रवेश फी सह जमा करावा व अकौंट विभागाची ओरीजनल ॲडमिशन पावती घेवून आपला प्रवेश निश्चित करावा.

➢ **Step-7** मेरीट लिस्ट नुसार ज्या अभ्यासक्रमांचे प्रवेश होणार आहेत त्या अभ्यासक्रमांसाठी मेरीट फॉर्म भरावा व वेळोवेळी येणा-या सूचनांप्रमाणे कार्यवाही करुन प्रवेश निश्चित करावा.

***